## अर्ज निशाणी क्र.५ वर आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी सादर केला आहे. वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द असा तूर्तातूर्त मनाई हुकूम मागितला की, प्रतिवादींनी दावा क्र.वहिवाट/एस आर/१५/२०१८ मधील मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय दि.०५.०२.२०१९ आधारे दावा मिळकतीमधील वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अथवा अडथळा करु नये.

२. दावा मिळकतीः

दावा मिळकत १अ:–

जिल्हा व तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी खानापूर पैकी मौजे सुलतानगादे येथील जमीन मिळकतीचे वर्णन व चतुःसिमा खालीलप्रमाणे–

| गट नं. | क्षेत्र<br>हे.आर. | आकार<br>रु.पैसे |
|---|---|---|
| २५३ | १–०४<br>पो.ख. ०–०६ | ०.३१ |

**पुर्वेस** – गट नं.२५५ ची शेत मिळकत.

**पश्चिमेस** – गट नं.२४५ ची शेत मिळकत.

**दक्षिणेस** – गट नं.२११ ची शेत मिळकत.

**उत्तरेस** – गट नं.२४६, २५२ व २५४ ची शेत मिळकत.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील संपूर्ण मिळकत वादीचे मालकी वहिवाटीची शेत मिळकत असून यामध्ये मका, गहू, हरभरा, भुईमूग पीक व त्यामध्ये बोअर वगैरे सर्व सोयी व तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरी हक्कासह.

(उपरोक्त मिळकतीस यापुढे **'दावा मिळकत १अ'** असे संबोधले आहे.)

**दावा मिळकत १ब:–**

जिल्हा व तुकडी सांगली, तालुका व पोटतुकडी खानापूर पैकी मौजे सुलतानगादे येथील जमीन मिळकतीचे वर्णन व चतुःसिमा खालीलप्रमाणे–

| गट नं. | क्षेत्र<br>हे.आर. | आकार<br>रु.पैसे |
|---|---|---|
| २३८ | ०–७०<br>पो.ख. ०–०४ | ०.१९ |

**पुर्वेस** – गट नं.२४५ ची शेत मिळकत.
**पश्चिमेस** – गट नं.२१४ ची शेत मिळकत.
**दक्षिणेस** – गट नं.२४५ ची शेत मिळकत.
**उत्तरेस** – गट नं.२२६, २२७, २३३ ते २३७ ची
व २४१ व २३९ ची शेत मिळकत.

येणेप्रमाणे चतुःसिमेतील संपूर्ण मिळकत वादीचे मालकी वहिवाटीची शेत मिळकत असून यामध्ये ऊसाचे पीक, हत्ती गवत व शंभर ते दिडशे फळाची झाडे व वादी क्र.१ यांनी पत्रा शेड, गोठा, गोबर गॅस बांधलेले आहे. तसेच या मिळकतीतून पूर्वी मंजूर झालेला उत्तर–दक्षिण चालीचा मुलाणवाडी ते सुलतानगादे डांबरी रस्ता अशी सर्व सोयी व तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरी हक्कासह.

(उपरोक्त मिळकतीस यापुढे '**दावा मिळकत १ब**' असे संबोधले आहे.)

३. वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती १अ व १ब वादी यांची वाडवडिलार्जित मालकी व वहिवाटीच्या आहेत. दावा मिळकत १अ व १ब मध्ये वादी हे ऊसाचे पिक घेत होते. दावा मिळकत १ब मधून पूर्वी सरकार मान्यतेने उत्तर दक्षिण चालीचा २० फूट रुंदीचा डांबरी व कच्चा रस्ता मुलाणवाडी ते सुलतानगादे गेला होता व आहे.

४. मौजे खानापूर येथील गट क्र.३१२ मध्ये प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्या मालकीच्या जमिनी आहेत. प्रतिवादी क्र.१ याची गट क्र.२१५ मध्ये जमीन आहे. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांची मौजे सुलतानगादे येथे शेतजमिनी नाहीत. प्रतिवादी हे वादी यांच्या मालकीची दावा मिळकत १अ गट क्र.२५३ व १ब गट क्र.२३८ मध्ये पूर्व–पश्चिम चालीचा रस्ता निर्माण करण्याचे खोटे प्रयत्न करीत आहेत.

५. प्रतिवादींनी मा.तहसिलदार यांचेकडे मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम ५ अन्वये दावा क्र. वहिवाट/एस आर/१५/२०१८ दाखल केला. प्रतिवादींनी अशी विनंती केली की त्यांच्या शेतजमिनी गट क्र.२१५ व ३१२ मध्ये जाणे–येणेसाठी असलेल्या रस्त्यामधील अतिक्रमण व अडथळा दूर करणेत यावा. मा.तहसिलदार यांनी दि.०५.०२.२०१९ रोजी सदरील दावा मंजूर केला व तथाकथित रस्त्यावरील अडथळा दूर करणेबाबत आदेश करणेत आला. वादींनी सदरील न्यायनिर्णयाविरुध्द मा.उपविभागीय अधिकारी, विटा यांचेकडे पुर्नविलोकन अर्ज क्र.२८९/२०१९ दाखल केले. सदरील अर्ज दि.१६.०२.२०२२ रोजी नामंजूर करणेत आला.

६. वादींनी असे कथन केले की, दावा मिळकती १अ व १ब मधून पूर्व–पश्चिम चालीचा कोणताही रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही. मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णय चुकीचे व बेकायदेशीर आहे. न्यायनिर्णय देणेपूर्वी प्रतिवादींनी दिलेले जबाब देखील पूर्णपणे मोघम व विषयांतर करणारे आहेत. त्या अनुषंगाने झालेला पंचनामा देखील वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे दिसून येते.

७. मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णयामधील निष्कर्षामध्ये असे नमूद करणेत आले आहे की, ''सदर गट हा संपतराव जगन्नाथ पाटील वगैरे यांचे मालकीचा आहे. मात्र मोजणी करुन हद्दी निश्चित केलेनंतर अतिक्रमण झाले आहे किंवा नाही हे दिसून येईल. तरी वरीलप्रमाणे परिस्थिती स्थळनिरीक्षणामध्ये दिसून आली आहे.'' वादींचे असे म्हणणे आहे की, आजपर्यंत कोणतीही मोजणी झालेली

नाही. मा. तहसिलदार यांचे न्यायनिर्णयामध्ये असे निष्कर्ष नोंदविण्यात आले की, अर्जदार यांचे अर्जात तथ्य नसून परिस्थिती बरोबर नाही. उपरोक्त निष्कर्ष नोंदवून देखील मा.तहसिलदार यांनी अर्जदारांचा (प्रतिवादींचा) अर्ज मंजूर केला.

८. मा.उपविभागीय अधिकारी विटा यांनी देखील वादी यांचे पुर्नविलोकन अर्ज नामंजूर करताना वादींनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची दखल घेतली नाही व त्याबाबत कोणतेही विवेचन केले नाही. म्हणून मा.उपविभागीय अधिकारी यांचे न्यायनिर्णय मोघम, बेकायदेशीर व अन्यायकारक आहे.

९. वादींनी असे कथन केले की, मा.तहसिलदार खानापूर यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट मधील तरतूदीनुसार जाबजबाब, साक्षीपुरावे नोंदविले नाहीत. उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही केलेली नाही. दावा मिळकत १ब गट क्र.२३८ मध्ये १९७२ सालापर्यंत पश्चिमेकडील वाडयातून पाणी पाठाने येत होते. सदरील पाठ १९७२ साली बंद झाला व त्यानंतर गट क्र.२१८ चे पश्चिमेस असलेला शेरी तलाव निर्माण झाला. त्यामुळे गावठाण नकाशात दिसत असलेला पूर्व–पश्चिम चालीचा पाठ आहे. त्याचा रस्ता म्हणून कधीही वापर नव्हता व नाही.

१०. प्रतिवादी क्र.१ ते ५ हे दावा मिळकतीमधून नव्याने रस्ता तयार करण्याच्या तयारीत आहेत. प्रतिवादी तसे उघडउघडपणे वादी यांना बोलून दाखवत आहेत. मा.तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांच्या निकालाआधारे रस्ता तयार झाल्यास वादींचे अपरिमित व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. म्हणून वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

११. प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ प्रस्तुत दाव्यात हजर झाले. प्रतिवादी क्र.४ हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले नाहीत म्हणून त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारित करणेत आला आहे. प्रतिवादी क्र.१, ३ व ५ यांनी निशाणी १४ येथे त्यांचे लेखी

म्हणणे सादर केले. प्रतिवादी क्र.२ यांनी पुरसीस निशाणी २९ प्रमाणे सदरील म्हणणे निशाणी १४ त्यांच्याकरीता स्वीकारले. प्रतिवादींनी अर्ज निशाणी ५ मधील कथनांचे खंडण केले. त्यांनी असे कथन केले की, वादींचा दावा व अर्ज निशाणी ५ खोटे आहेत. मा.तहसिलदार व मा.उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले निकाल बरोबर व कायदेशीर आहेत.

**१२.** प्रतिवादींनी पुढे असे कथन केले की, मौजे सुलतानगादे येथील गट क्र.२३८ मध्ये पूर्व–पश्चिम चालीचा रस्ता सुमारे ८० वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात होता व आहे. सदरील रस्त्याची खूण गावच्या नकाशात नमूद आहे. सदरचा रस्ता पाठालगत होता. वादींनी सदरील रस्त्यामध्ये अतिक्रमण करुन गोठा व पत्रा शेड बांधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे, प्रतिवादींना गट क्र.२३८ मधून त्यांच्या मालकीच्या मिळकती गट क्र.२१५ व ३१२ मध्ये जाणे–येणे अडचणीचे झाले. मा. तहसिलदार यांनी प्रतिवादी यांच्या अर्जावरुन स्थळपाहणी व पंचनामा करुन अडथळा दूर करण्याचे आदेश दिले. मा.उपविभागीय अधिकारी विटा यांनी देखील वादींचे पुर्नविलोकन अर्ज फेटाळले आहे.

**१३.** प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींना त्यांचे मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी उपरोक्त रस्त्याव्यतिरिक्त अन्य सोयीस्कर रस्ता नाही. वादींनी दाखल केलेला तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे मिळकतीमध्ये जाणे येणेस हरकत अडथळा निर्माण होणार आहे. याउलट, अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**१४.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादींतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.व्ही.कदम व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.एस.पी.दुग्गम यांचा युक्तीवाद ऐकला.

**१५.** अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व

त्यावरील कारणमिमांसे सहित निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांना या कामी प्रथम दर्शनी केस आहे, हे वादी शाबीत करतात काय? | **....होय.** |
| २. | सोयीचा समतोल (Balance of convenience) वादी यांचे बाजूने आहे, हे वादी शाबीत करतात काय? | **....होय.** |
| ३. | तूर्तातूर्त मनाई आदेश न झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे, हे वादी शाबीत करतात काय? | **....होय.** |
| ४. | काय आदेश ? | **....अर्ज मंजूर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः–**

**१६.** तूर्तातूर्त मनाई आदेश मिळविण्यासाठी मा.तहसिलदार व मा.उपविभागीय अधिकारी खानापूर यांचे न्यायनिर्णय प्रथमदर्शनी चुकीचे असल्याचे दर्शविणे व सिध्द करणे वादी यांचेवर बंधनकारक आहे. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.व्ही.व्ही.कदम यांनी असा युक्तिवाद केला की, मा.तहसिलदार यांचे आदेश/ न्यायनिर्णय दि.०५.०२.२०१९ हे प्रथमदर्शनी बेकायदेशीर व चुकीचे आहे. मा.तहसिलदार यांनी त्यांचे न्यायनिर्णयात असे निष्कर्ष नोंदविले की, मोजणी करुन हद्दी निश्चित केल्यानंतर अतिक्रमण झाले आहे किंवा नाही हे दिसून येईल. अतिक्रमण आहे किंवा नाही हे निश्चित करणेसाठी कोणतीही मोजणी करण्यात आली नाही व प्रतिवादी यांचा अर्ज/दावा मंजूर करणेत आला. मा.तहसिलदार यांनी त्यांचे

न्यायनिर्णयात असे निष्कर्ष नोंदविले की, अर्जदारांचे (प्रतिवादी) अर्जात तथ्य नसून परिस्थिती बरोबर नाही. तरी देखील मा.तहसिलदार यांनी प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर केला. मा.तहसिलदार यांनी ''अर्जात तथ्य नसून'' च्या ऐवजी ''अर्जात तथ्य असून'' अशी दुरुस्ती केली व तसा दुरुस्ती आदेश पारित करणेपूर्वी वादी यांना कोणतीही नोटीस दिली नाही व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही. मा.तहसिलदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट च्या कायदेशीर तरतूदीनुसार कार्यवाही केली नाही. म्हणून सदरील न्यायनिर्णय बेकायदेशीर व चुकीचा आहे. मा.उपविभागीय अधिकारी खानापूर यांनी देखील वादी यांच्या आक्षेपांचा विचार केला नाही. मा.उपविभागीय अधिकारी यांनी कोणतीही कारणमिमांसा व विवेचन न नोंदविता न्यायनिर्णय पारित केले.

**१७.** वादींचे विद्वान विधीज्ञ श्री.व्ही.व्ही.कदम यांनी असा युक्तिवाद केला की, मामलेदार कोर्ट ॲक्ट च्या तरतूदीनुसार कार्यवाही न झाल्यामुळे मा.तहसिलदार व मा.उपविभागीय अधिकारी यांचे न्यायनिर्णय बेकायदेशीर आहेत. याकरीता त्यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णय १) ***सुदाम नामदेव मडके विरुध्द महाराष्ट्र राज्य २०२२ (२)ऑल एम आर १३६***, २) ***जगदिश श्रीराम धांडे विरुध्द रामचंद्र चिंडूजी धांडे २०२२ (२) बॉम्बे सी आर १२२*** वर भिस्त ठेवली.

**१८.** प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञ श्री.एस.पी.दुग्गम यांनी असा युक्तिवाद केला की, मा.तहसिलदार व मा.उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायनिर्णयांविरुध्द प्रस्तुत न्यायालयात दाद मागता येत नाही. वादींचा अर्ज निशाणी ५ व दावा या न्यायालयात चालू शकत नाही. वादी यांचे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, अधिकाऱ्यांनी कायद्याप्रमाणे कार्यवाही केली नसेल अथवा कायदेशीर तरतूदींचा उल्लंघन केला असेल तर त्यांच्या आदेशांविरुध्द दिवाणी न्यायालयात दाद मागता येते. याकरीता त्यांनी १) ***आंध्रप्रदेश राज्य विरुध्द मंजेती लक्ष्मीकांथाराव व***

***इतर (२०००)३ एस सी सी ६८९***, २) ***वासुदेव पंढरीनाथ रायकर व इतर विरुध्द मनोज मोहन दळवी व इतर २०१८ (४) महाराष्ट्र लॉ जर्नल १२७***, ३) ***मोहम्मदखान रहिमखान विरुध्द शंकर मारुती ढगे व इतर २०१७ (३) महाराष्ट्र लॉ जर्नल १३५*** या न्यायनिर्णयांवर भिस्त ठेवली.

**१९.** मी अभिलेखाचे अवलोकन केले आहे. प्रतिवादी यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ कलम ५ अन्वये दाखल केलेले अर्ज **(निशाणी ३/९)** वरुन ही बाब स्पष्ट होते की, सदरील अर्ज मोघम स्वरुपाचा आहे. अडथळा कोणत्या जमिनीमध्ये निर्माण करणेत आला ही बाब प्रतिवादींनी सदरील अर्जात स्पष्टपणे नमूद केली नाही. तथाकथित रस्ता व वहिवाट केंव्हापासून अस्तित्वात आहे हे देखील सदरील अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद नाही. मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ कलम ८ प्रमाणे साधे अर्ज (Informal petition) हे वादपत्र (Plaint) म्हणून स्वीकारता येते परंतु त्याकरीता तसा शेरा नोंदविणे मामलेदार यांचेवर सदरील कलम ८ प्रमाणे बंधनकारक होते. मामलेदार/तहसिलदार यांनी तसा कोणताही शेरा नोंदविला नाही. मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम १० प्रमाणे वादपत्र (Plaint) ची पडताळणी (Verification)घेणे मामलेदार कोर्ट ॲक्ट कलम १० प्रमाणे आवश्यक होते परंतु, तशी कोणतीही पडताळणी (Verification) घेण्यात आली नाही. मा.तहसिलदार यांचे न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, त्यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये कोणताही तोंडी पुरावा नोंदविला नाही. यावरुन ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते की, मा.तहसिलदार यांनी मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील तरतूदीनुसार प्रकरणाची सुनावणी घेतली नाही. मा.मुंबई उच्च न्यायालयाने त्यांचे न्यायनिर्णय १) ***सुदाम नामदेव मडके विरुध्द महाराष्ट्र राज्य २०२२ (२)ऑल एम आर १३६***, २) ***जगदिश श्रीराम धांडे विरुध्द रामचंद्र चिंडूजी धांडे २०२२ (२) बॉम्बे सी आर १२२*** मध्ये असे निष्कर्ष नोंदविले आहे की, मामलेदार कोर्ट ॲक्ट च्या तरतूदीनुसार कार्यवाही /सुनावणी झाली नसल्यास

संबंधित प्रकरणामध्ये पारित करण्यात आलेले न्यायनिर्णय योग्य व बरोबर आहेत असे म्हणता येत नाही. सदरील निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणामध्ये तंतोतंत लागू होतात.

२०. मा.तहसिलदार यांनी त्यांचे न्यायनिर्णयामध्ये असे निष्कर्ष नोंदविले की, रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे का नाही हे मोजणी करुन हद्दी निश्चित केल्याशिवाय समजून येत नाही. सदरील बाब पंचनामा दि.११.०१.२०१९ **(निशाणी ३/१२)** मध्ये देखील स्पष्टपणे नमूद आहे. मोजणी आवश्यक असताना मा.तहसिलदार यांनी मोजणी करुन घेतली नाही व अतिक्रमण/अडथळा आहे किंवा नाही याबाबत स्पष्ट निष्कर्ष न नोंदविता अर्ज मंजूर केले. मा.तहसिलदार यांनी त्यांचे न्यायनिर्णयामध्ये असे निष्कर्ष नोंदविले की, अर्जात तथ्य नसून परिस्थिती बरोबर नाही. तरी देखील मा.तहसिलदार यांनी प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर केला.

२१. मा.तहसिलदार यांनी न्यायनिर्णय दि.०५.०२.२०१९ पारित केल्यानंतर दि.१७.०७.२०१९ रोजी दुरुस्ती आदेश पारित करुन ''अर्जदाराच्या अर्जामध्ये तथ्य नसून परिस्थिती बरोबर नाही'' या ऐवजी ''अर्जदाराच्या अर्जामध्ये तथ्य असून परिस्थिती बरोबर नाही'' अशी दुरुस्ती केली. दुरुस्ती आदेशाची नक्कल (**निशाणी १७/१)** येथे दाखल आहे. सदरील दुरुस्ती न्यायनिर्णयामधील अति महत्वाचा निष्कर्ष बदलून टाकणारी आहे. अशा स्वरुपाची दुरुस्ती करणेपूर्वी मा.तहसिलदार यांनी वादी यांना कोणतीही नोटीस दिली नाही व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही.

२२. मा.उपविभागीय अधिकारी खानापूर यांचे पुर्नविलोकन अर्ज क्र.रस्ता/रिव्हीजन/२८९/२०१९ मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, त्या न्यायनिर्णयामध्ये कोणतीही कारणमिमांसा व विवेचन नमूद नाही. प्रस्तुत वादींनी पुर्नविलोकन अर्जामध्ये जे मुद्दे उपस्थित केले त्या मुद्यांचा विचार व विश्लेषण व त्याबाबत कोणतीही कारणमिमांसा मा.उपविभागीय अधिकारी

यांचे न्यायनिर्णयामध्ये नमूद नाही.

२३. उपरोक्त कारणमिमांसेवरुन प्रथमदर्शनी मा.तहसिलदार व मा. उपविभागीय अधिकारी खानापूर यांचे न्यायनिर्णय योग्य, बरोबर, कायदेशीर तसेच मामलेदार कोर्ट ॲक्ट मधील तरतूदीनुसार बरोबर आहेत असे म्हणता येत नाही. वादी यांचे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तिवाद की, अधिकाऱ्यांनी कायद्याप्रमाणे कार्यवाही केली नसेल अथवा कायदेशीर तरतूदींचा उल्लंघन केला असेल तर त्यांच्या आदेशांविरुध्द दिवाणी न्यायालयात दाद मागता येते हे मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे न्यायनिर्णय १) ***आंध्रप्रदेश राज्य विरुध्द मंजेती लक्ष्मीकांथाराव व इतर (२०००)३ एस सी सी ६८९***, २) ***वासुदेव पंढरीनाथ रायकर व इतर विरुध्द मनोज मोहन दळवी व इतर २०१८ (४) महाराष्ट्र लॉ जर्नल १२७***, ३) ***मोहम्मदखान रहिमखान विरुध्द शंकर मारुती ढगे व इतर २०१७ (३) महाराष्ट्र लॉ जर्नल १३५*** मधील निष्कर्षानुसार योग्य व बरोबर आहे, असे माझे मत आहे.

२४. प्रतिवादी यांनी तथाकथित रस्त्याबाबत व अतिक्रमण व अडथळा बाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, तथाकथित रस्ता गावठाण नकाशा मध्ये दर्शविला आहे. परंतु, गावठाण नकाशा (निशाणी ३/१३) मध्ये जी रेष दर्शविण्यात आली आहे त्याबाबत स्पष्ट समजुतीच्या खुणा व वर्णन नमूद नाही म्हणून नकाशामधील रेष हा रस्ता आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. तथाकथित रस्ता ८० वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात होता व आहे हे देखील प्रथमदर्शनी सिध्द झाले नाही. उपरोक्त कारणमिमांसेवरुन मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की, प्रथमदर्शनी प्रकरण वादींच्या हक्कात आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ वर **होकारार्थी** निष्कर्ष नोंदवितो.

**मुद्दे क्रमांक २ व ३ बाबत :-**

२५. मुद्दे क्रमांक २ व ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे व कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळणेकरीता दोन्ही मुद्दे एकत्र विचारात घेण्यात येत आहेत.

२६. मा.तहसिलदार व मा.उपविभागीय अधिकारी यांचे न्यायनिर्णय व आदेश मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ मधील कायदेशीर तरतूदीनुसार योग्य व बरोबर नाही, असे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे. सदरील आदेश व न्यायनिर्णयांचा आधार घेऊन वादींच्या मालकी व वहिवाटीच्या दावा मिळकतीमध्ये तथाकथित अडथळा व अतिक्रमण दूर करणेचा प्रतिवादी यांना कोणताही कायदेशीर अधिकार पोहचत नाही. प्रतिवादी यांचे लेखी म्हणण्यामधील कथनांचे अवलोकन केले असता ही बाब प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकतीमध्ये रस्ता असल्याचा दावा करीत आहेत. यावरुन प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकतीवरील कब्जात हरकत अडथळा निर्माण करण्याची धमकी देत आहेत, ही बाब संभाव्य वाटते. वादी यांनी त्यांचे अर्ज निशाणी ५ चे पृष्टयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी ६ दाखल केले आहे.

२७. मा.तहसिलदार व उपविभागीय अधिकारी खानापूर यांचे न्यायनिर्णय व आदेश प्रमाणे प्रतिवादींनी रस्ता निर्माण करणेचा व तथाकथित अडथळा दूर करणेचा प्रयत्न केल्यास वादींची हालअपेष्टा व गैरसोय (Hardship and inconvenience) होणार आहे. अर्ज निशाणी ५ मंजूर केल्यास प्रतिवादी यांची कोणतीही गैरसोय होणार नाही कारण तथाकथित रस्ता अस्तित्वात आहे किंवा कसे तसेच रस्त्यामध्ये अडथळा व अतिक्रमण आहे किंवा कसे, हे प्रथमदर्शनी सिध्द झाले नाही. वादींच्या शेतजमिनी म्हणजेच दावा मिळकतीमध्ये नवीन रस्ता निर्माण झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच त्यांच्या जमिनीमधील पिकांचे

देखील नुकसान होणार आहे. ७/१२ उतारे **(निशाणी ३/१, ३/२)** चे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, वादी दावा मिळकतीमध्ये पिक घेत आहेत. सदरील ७/१२ उताऱ्यांमध्ये सन २०२०–२१ मध्ये वादींनी बाजरी, ज्वारी व तूर यासारखी पिके घेतल्याचे स्पष्ट होते.

२८. उपरोक्त कारणमिमांसेवरुन मी या निष्कर्षापर्यंत पोहचलो आहे की, वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी (*Prima-facie)* केस आहे, वादींच्या हक्कात सोयीचा समतोल (Balance of convenience) आहे. तसेच, तुर्तातूर्त मनाई हुकूम न दिल्यास वादींचा न भरुन येणारा अथवा अपरिमित नुकसान (Irreparable loss) होणार आहे. उपरोक्त कारणांवरुन मी मुद्दे क्रमांक २ व ३ वरील निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवितो.

**मुद्दा क्रमांक ४ बाबतः–**

२९. वरील मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत केलेल्या विवेचनांवरुन प्रस्तुत अर्जात तथ्य व गुण (Merit) असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचीत आहे म्हणून मी खालील आदेश पारित करीत आहे :–

## आ दे श

**अ**. वादी यांचा निशाण ५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**ब**. प्रतिवादी क्र.१ ते ५अ यांचेविरुध्द असा अंतरिम मनाई आदेश पारित करणेत येतो की, त्यांनी स्वतः अथवा इतर इसमांमार्फत दावा/अर्ज क्र. वहिवाट/एस आर/१५/२०१८ मधील मा.तहसिलदार खानापूर यांचे न्यायनिर्णय दि.०५.०२.२०१९ चा आधार घेऊन दावा मिळकती १अ व १ब गट क्र.२५३ व २३८ मौजे सुलतानगादे, ता.खानापूर, जि.सांगली मधील वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीत प्रस्तुत दाव्यामध्ये अंतिम न्यायनिर्णय होईपर्यंत हरकत अडथळा करु नये.

क. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालाच्या अधीन राहील.

-

RAFEEQUE SHAIKH ASADULLAH SHAIKH

Digitally signed by RAFEEQUE SHAIKH ASADULLAH SHAIKH
Date: 2023.02.08 10:58:57 +0530

दिनांक ०६/०२/२०२३. (रफिक अ. शेख)

ठिकाण विटा. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली

Case No : RCS No 356 of 2022
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer: Vanita A Mane
Court Name: 3rd Jt. Civil & Criminal Court,Vita. Dist. Sangli.
Date of decision : 06/02/2023
Order signed by P.O.on : 07/02/2023
Order uploaded on : 07/02/2023